www.esakal.com

सकाळ

• पुणे, गुरुवार, १३ डिसेंबर २०१८

# आदित्य मांडके, सूरज गोंडची अष्टपैलू चमक

Cricket Schoolympics

M3 SPORTS by Kedar Jadhav

ABIL INFRASTRUCTURE | REAL ESTATE | HOSPITALITY

क्रिकेट स्पर्धेत बुधवारी सिटी इंरनॅशनल प्रशालेचा आदित्य मांडके आणि जयहिंद प्रशालेचा सूरज गोंड यांची अष्टपैलू चमक वैशिष्ट्यपूर्ण ठरली.

एनसीएलच्या मैदानावर झालेल्या सामन्यात आदित्य मांडकेच्या अष्टपैलू कामगिरीने सिटी इंटरनॅशनल प्रशालेने स्प्रिंग डेल प्रशालेचा १४ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना सिटी प्रशाला संघाने ६ बाद ९१ धावा केल्या. यात आदित्यच्या १७ चेंडूंतील ३४ धावांचा वाटा मोठा होता. त्यानंतर ९१ धावांच्या आव्हानाचा बचाव करताना आदित्याने १६ धावांत ३ गडी बाद केले. प्रतिस्पर्धी स्प्रिंग डेलचा डाव ९ बाद ७७ असा मर्यादित राहिला.

स्पर्धेत सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या सूरज गोंडच्या अशाच अष्टपैलू कामगिरीने जयहिंद प्रशाला संघाने बिशप्स को-एड संघाचा ३० धावांनी पराभव केला. सूरजने प्रथम फलंदाजी करताना फटकाविलेल्या २९ चेंडूंतील ६१ धावांमुळे जयहिंदने १ बाद १०५ धावा केल्या. सूरजने १२ चौकार तडकावले. आव्हानाचा पाठलाग करताना बिशप्सचा डाव ८.३ षटकांतच ७५ धावांत संपुष्टात आला. सूरजने गोलंदाजीतही चमक दाखवताना १२ धावांत ३ गडी बाद केले.

आज झालेल्या अन्य सामन्यात अँग्लो उर्दू प्रशाल्याने अभिनव इंग्रजी माध्यम प्रशाल्याचा पाच गडी राखून पराभव केला. अभिनवला सात बाद ६७ असे रोखल्यावर अँग्लो उर्दू प्रशलेने हे आवाहन पाच गड्यांच्या मोबदल्यात पार केले. जेएन पेटिट प्रशाला संघाने साधना विद्यालयाचा चार गडी राखून पराभव केला.

### संक्षिप्त धावफलक

**अभिनव इंग्रजी माध्यम प्रशाला, एरंडवणे ७ बाद ६७** (वेदांत देशमुख २२, समद पटेल २-८) पराभूत वि. अँग्लो उर्दू प्रशाला, कॅम्प ५ बाद ६८ (अनस शेख १६)

**सिटी इंटरनॅशनल स्कूल, वानवडी ६ बाद ९१** (आदित्य मांडके ३४, प्रथमेश पटवर्धन २-२०) वि.वि. सिंहगड स्प्रिंग डेल प्रशाला, वडगाव ९ बाद ७७ (अथर्व इनामदार २०, आदित्य मांडके ३-१६)

**साधना विद्यालय, हडपसर सर्वबाद ५२** (देवेंद्र जैन ३-११) पराभूत वि. जे. एन. पेटिट प्रशाला ६ बाद ५३ (साहिल नाईक २०, ओम खेंगट २-६)

**जयहिंद प्रशाला, पिंपरी १ बाद १०५** (सूरज गोंड ६१) वि.वि. बिशप्स को-एड प्रशाला, उंड्री सर्वबाद ७५ (सूरज गोंड ३-१२).



एनसीएल : सिटी इंटरनॅशनल प्रशालेच्या विजयात निर्णायक खेळी करणारा कर्णधार आदित्य मांडके आकर्षक फटका मारताना.